**बोधचिन्हाचे अनावरण :** सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी स्पर्धा

# साय-फाय करंडक रंगणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांचा धोका वाढू लागला आहे. डिजिटलचे धोके आणि समस्या लोकांना समजाव्यात आणि सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने क्विक हिल टेक्नॉलॉजीज् लिमिटेड कंपनीच्या क्विक हील फाउंडेशन या संस्थेने पुणे शहर पोलिसांशी भागीदारी करून दि. २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत साय-फाय करंडक २०१७ या आगळ्यावेगळ्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. पुण्यातल्या भरत नाट्य मंदिर येथे ही स्पर्धा रंगणार असून, दोन महिन्यांच्या निवड प्रक्रियेनंतर अंतिम फेरीसाठी २८ संघांची निवड करण्यात आली आहे.

मानवी आयुष्यावर डिजिटल क्रांतीचा झालेला परिणाम व्यापकपणे दर्शवण्यासाठी सुरु केलेले ऑनलाईन व ऑफलाईन एकअंकी नाटकांचे हे आधुनिक व्यासपीठ आहे. साय-फाय करंडक २०१७ स्पर्धेच्या बोधचिन्हाचे उद्घाटन शुक्रवारी क्विक हील टेक्नॉलॉजीज् लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, पुणे पोलिसांच्या वित्तीय गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू) आणि सायबर गुन्हे विभागाचे पोलीस



साय-फाय करंडक २०१७ स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण करताना (डावीकडून) राधिका फडके, मिलिंद पाटील, कैलास काटकर व प्रदीप वैद्य.

उपायुक्त मिलिंद पाटील आणि एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सायबर क्राईम सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके उपस्थित होत्या.

साय-फाय करंडक २०१७ हा उपक्रम क्विक हील फाउंडेशन आणि पुणे शहर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असून एक्स्प्रेशन लॅबचेही साह्य लाभले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना दर्जेदार संहिता तयार करता यावी, म्हणून सायबर गुन्ह्याच्या क्षेत्रातल्या खऱ्याखुऱ्या घटनांची माहिती देऊन पुणे शहर पोलीस दलाची सायबर गुन्हे शाखा यात महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. नेटीझन्ससाठी डिजिटलायझेशनचे आभासी जग अधिक सुरक्षित करण्याठी पुणे पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे.

पुणे शहर पोलीस दलाच्या ईओडब्ल्यू आणि सायबर सुरक्षा विभागाचे पोलीस उपायुक्त मिलिंद पाटील म्हणाले, ''डिजिटायझेशनच्या वाढीमुळे सायबर गुन्ह्यांचे धोकेही दिवसेंदिवस वाढत चालले आहेत.

## अंतिम फेरीसाठी २८ संघांची निवड

- पुण्यातल्या भरत नाट्य मंदिर येथे रंगणाऱ्या अंतिम फेरीसाठी २८ संघांची निवड करण्यात आली आहे. 'सायबर जगतातले मानवी आयुष्य - सोयीस्कर कितपत आणि धोकादायक कितपत?' या थीमवर आधारित नाटके नाट्य-चित्रपटसृष्टीतल्या प्रसिद्ध कलाकारांसमोर सादर करण्याची संधी या निवडक संघांना मिळणार आहे.
- या स्पर्धेत महाराष्ट्राबाहेरील नाट्य कलावंतांना आपली कला सादर करण्याची संधीही देण्यात आली आहे. उत्सुक स्पर्धक सोशल मीडियावर आपली नाटके अपलोड करू शकतात व त्याची लिंक inffo@cyfiarts.com या ई-मेल आयडीवर पाठवू शकतात.
- ज्या स्पर्धकाला जास्त लाईक्स मिळतील, तो या स्पर्धेचा विजेता ठरणार आहे. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक तज्ज्ञ परीक्षकांकडून देण्यात येणार आहे.

२०१७मध्ये पुणे शहरात ४ हजारांहून अधिक सायबर गुन्ह्यांची नोंद झाली, तर २०१६मध्येही हा आकडा २,०७९ इतका होता.

यातून एक लक्षात येते, की हा धोका दररोज वाढत चालला आहे आणि म्हणूनच, सायबर गुन्ह्यांबाबत योग्य माहिती देऊन त्याविषयी नेटीझन्सना जागरूक करण्याची आवश्यकताही वाढीस लागली आहे. ही बाब ध्यानात घेऊन, साय-फाय करंडकासारख्या आधुनिक कलेच्या माध्यमातून जागृतीबाबत पाऊल उचलण्यात आले आहे.

क्विक हील टेक्नॉलॉजीज् लिमिटेडचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर म्हणाले, ''नेटीझन्सना डिजिटल जगताची काळी बाजू वेळोवेळी दाखवून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नांतूनच साय-फाय करंडकासारखे उपक्रम आकाराला येतात. या आगळ्यावेगळ्या एकअंकी नाट्य महोत्सवातून लोकांना डिजिटल जगतातील धोके आणि समस्या समजतीलच; त्याचबरोबर नाट्यकर्मींनाही त्यांची कला सादर करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.''